**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका नांदेड**

**( दिनांक 31.03.2018 रोजीची सर्वानुमत तहकुब करण्यात आलेली अर्थसंकल्पीय विशेष सभा)**

मंगळवार, दि. 10.04.2018 रोजी दुपारी 01.00 वाजता नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेंची अंदाजपत्रकीय विशेष सभा महानगरपालिकेच्या कै. शंकररावजी चव्हाण प्रेक्षागृहात श्री गुरुगोविंदसिंघजी स्टेडीयम परिसर नांदेड येथे भरविण्यात आली होती.

उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील स.सदस्य उपस्थित होते.

**मा. सौ. भवरे शिलाबाई किशोर, महापौर**

**सर्वश्री श्रीमती/**

| | |
|---|---|
| पाटील विनय विश्वांबर | राऊत दिपक नरहरी |
| पाटील सुनंदा सुभाष | कल्याणकर ज्योती किशन |
| कल्याणकर बालाजी देवीदास | कदम ज्योती मनिष |
| तुप्पेकर संगीता सखाराम | मुळे कविता संतोष |
| देशमुख सतीश पुंडलीकराव | पवळे उमेश देवराव |
| पूरी कौशल्या शंकर | कोकाटे करुणा भीमराव |
| गाडीवाले संदिपसिंघ शंकरसिंघ | वाघमारे दयानंद नामदेव |
| स्वामी शैलजा किशोर | चव्हाण आनंद शंकरराव |
| पिंपळे महेंद्र हिरामन | पावडे जयरी निलेश |
| नेरलकर अपर्णा ऋषीकेश | खान फारुख अली इलीयाज खान |
| यन्नम राजेश लक्ष्मीनारायण | देशमुख वैशाली मिलींद |
| कनकदंडे महेश मारोतराव | रायबोले ज्योती सुभाष |
| पाटील संगीता विठ्ठल | खान अब्दुल अलीम खान अब्दुल जलील खान |
| सोनाळे दुष्यंत गणेशराज | येवनकर मोहिनी विजय |
| खान सलीमा बेगम नुरुल्ला खान | गड्डम नागनाथ दत्तात्रय |
| स्वामी किशोर मल्लीकार्जून | गाडीवाले मनमितकौर नरेंद्रसिंघ |
| तिडके प्रशांत विठ्ठल | गजभारे बापुराव नागोराव |
| शहाणे अल्का जगदीश | पवार जयश्री परमेश्वर |
| गाडीवाले विरेंद्रसिंघ जगतसिंघ | सय्यद शेर अली अ. महेबुब अली |
| आसीया बेगम अब्दुल हबीब | रझीया बेगम बाबु खान |
| खान म.मसुद अहेमद खान उस्मान खान | अब्दुल सत्तार अ. गफुर |
| शमीम बेगम शेख जावीद | अरशीया कौसर मोहम्मद हबीब |
| अ. रशिद अ. गणी | सोनकांबळे गंगाबाई मल्हारी |
| कुरेशी रेहाना बेगम चाँद पाशा | अब्दुल शमीम अब्दुल्ला साब |
| मोहम्मद साबेर चाउस मोहम्मद नासेर चाउस | अ. लतीफ अ. मजीद |
| शबाना बेगम मो. नासेर | फरहत सुलताना खुर्शीद अन्वर |
| कोकुलवार नागेश गोविंद | कापुरे गितांजली रामदास |
| अ. हफीज अ. करीम | आयेशा बेगम शे. असलम |
| फारुख हुसेन कासीम पिरान | रावत दिपकसिंग काशिनाथसिंग |
| सोडी गुरुप्रितकौर दिलीपसिंघ | खालसा प्रकाशकौर सुरजितसिंघ |
| रावत भानुसिंग गयादिनसिंग | तेहरा अमीतसिंग गोपालसिंग |
| मुथा कांताबाई प्रकाशचंद | यादव प्रभा ईश्वरलाल |
| नवाब गुरमितसिंघ ब-यामसिंघ | हुसेन शोएब मजहर |
| गोडबोले ज्योत्सना राजु | अ. फयीम अ. मुनीर |
| मोरे दिपाली संतोष | गोरे शांता संभाजी |
| काळे राजु गोविंदराव | गुपिले बेबी जनार्धन |
| जाधव श्रीनिवास नारायणराव | देशमुख मंगला गजानन |

सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सौ. भवरे शिलाबाई किशोर, महापौर हे होते तसेच श्री गणेश देशमुख आयुक्त, श्री रत्नाकर वाघमारे, उपआयुक्त, विकास, श्री कोलगणे, मुख्य लेखापरिक्षक, डॉ. सौ. सुमती ठाकरे, प्र. मुख्य वैद्यकिय अधिकारी, श्री गिरीष कदम, कार्यकारी साबांवि, श्री सुग्रीव अंधारे कार्यकारी अभियंता पापु, व महानगरपालिकेतील सर्व सहायक आयुक्त, व सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

**महापौर.** दिनांक 10.04.18 च्या नियमीत मासिक सभेचे कामकाज संपल्यामुळे लगेचच सर्वानुमते तहकुब केलेली विशेष अर्थसंकल्पीय सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात येते.

**विषय क्र. 1 :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 95 च्या अधिन राहून मा. आयुक्त नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांनी सादर केलेले व स्थायी समितीने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 96 नुसार केलेल्या शिफारशी नुसार सालसन 2017-2018 चे सुधारीत अंदाजपत्रक व सालसन 2018-2019 चे मुळ अंदाजपत्रक मंजूर करणे बाबत.

**आनंद चव्हाण** बजेट स्थायी समितीने सादर केले त्याबाबत मा.सभापती यांचे अभिनंदन करतो. बजेटमध्ये नगररचना विभागाकडून जास्त महसुल होणार असल्याने त्या विभागासाठी अभियंते व इतर कर्मचारी वर्ग देणे गरजेचे आहे. तो विभागा सक्षम करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे मनपाचे आर्थिक उत्पन वाढ होणार आहे. तसेच कै.शंकररावजी चव्हाण प्रेक्षागृहात दर पाच तारखेला स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन ठेवण्यात येते त्यासाठी त्याला सक्षम बनविण्यात यावे. वसुलीचा अभाव आहे ती वाढविण्यासाठी प्रयत्न करावे. एक रुम अनाधिकृत असेल तर सर्व इमारत अनाधिकृत आहे असे गृहीत धरुन सर्व इमारतीस शास्ती लावतो त्याकरीता एकाच रुमला शास्ती लावण्यात यावी.

**महेश कनकदंडे** बांधकाम परवानगी लोकांना त्वरीत देण्यात यावी. जेवढे अनाधिकृत बांधकाम आहे तेवढची शास्ती आकारण्यात यावी. लोक त्यामुळे टॅक्स लवकर भरतील आणि आपले उत्पन वाढ होईल.

**बापुराव गजभारे** पत्रकारासाठी या बजेटमध्ये तरतुद करावी.मुंबई व परभणी मनपाकेत त्यांच्यासाठी तरतुद केलेली आहे आपल्याही मनपाकेच्या बजेट मध्ये तरतूद करावी अशी सभागृहास विनंती आहे. मी आयुक्तांचेही अभिनंदन करतो. कारण आपणास सामाजीक जाण ठेवून आपण आपल्या 10 दिवसाचा पगाराची रक्कम ही मंतीमद मुलाच्यासाठी मदत दिली आहे. म्हणुन मी एक सामाजिक कार्यकर्ता या नात्यांने व मला समाजाची जाण असल्याने माझ्याही भावना त्या मंतीमद मुलाच्या बाबत संवेदनशिल असल्याने मला जे एका महीण्याचे मानधन मिळते त्यापैकी अर्धे मानधन देण्याचे मी जाहीर करतो.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमीत्त आपण हार अर्पण करण्यासाठी जी शिडीचा उपयोग करतो ती शिडी अंत्यत कमकुवत आहे ती शिडी बदल्यात यावी. त्याठिकाणी अटोचा थांबा हा थांबाच झाला आहे. म्हणुन त्या ठिकाणी ते अटो थांबणार नाही याची दक्षता घ्यावी. यावर्षात पुतळा विटंबणाचे प्रकार फार वाढले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळयाच्या वॉचमनकी करणा-या वॉचमनला ताकीद दयावी त्यांनी पुतळयाचे संरक्षण योग्य पध्दतीने करावे.

**दिपकसिंह रावत** मी मा.आयुक्त व मा. सभापती यांचे स्वागत करतो त्यांनी अत्यंत चांगले बजेट याठिकाणी दिले आहे. त्याबाबत आपले अभिनंदन करतो.

सभापती यांच्यावर एक शेर म्हणण्यात आला.

मा. सभापती यांनी प्रशासनाने सादर केलेल्या बजेटमध्ये केवळ 7.50 कोटी रुपयाची वाढ करुन सर्व साधारण सभेसमोर सादर केले आहे. आपण पान क्रमांक 3 वर जमा बाजू व खर्च बाजू दर्शविली आहे यावर आपले लक्ष वेधु इच्छीतो. सभापतीवर यापुर्वी आपण आरोप करतो, परंतू प्रशासनाने या ठिकाणी काही चुका केल्या आहेत असे मला वाटते.जमा बाजूमध्ये 325 कोटी 54 लक्ष दाखविले आहे. खर्च बाजू ही 325 कोटी 51 लक्ष रुपये दाखविले आहे.सर्वात कमी टक्केवारी ही जमा बाजू मध्ये आहे. यात केवळ रु. 3 लक्षाचा फरक दिसुन येतो. आपण आस्थापनावर जास्त खर्च करीत आहोत. आस्थापनेवरील खर्च कमी केला पाहीजे. उत्पन वाढीकरीता आपण प्रयत्न करतो. तसा आस्थापनेवरील खर्चावरही लक्ष दयावे. मालमता कराची एकुण वसुली ही रु 166 कोटीची होती आणि जमा झाली 56 कोटी रुपये. थकबाकीची शास्ती 48 कोटी रुपये आहे. यात केवळ 2.7 टक्के वसुली झाली आहे.अनाधिकृत बांधकाम शास्ती ही 2.87 लक्ष रुपयाची वसुली झालेली आहे. ही देखील अत्यंत कमी आहे. एक मजला त्याचा अनाधिकृत असेल तर आपण सर्वच मजले हे अनाधिकृत आहेत असे आपण समजतो. त्याप्रमाणात शास्ती आकारतो. पाणी पटीची थकबाकी रु.13 कोटीची आहे. ही देखील वाढ आपणास करता येईल. आपल्याकडे कर्मचारी यांचा अभाव आहे त्यामुळे पाणी पटटी कमी वसुली होत आहे.मालमता कराच्या वसुली सोबतच पाणी पटटी वसुली करावी. शासनाने एलबीटी बंद करुन त्याचे अनुदानापोटी 6 कोटी 10 लक्ष दर महा मिळत आहे. एलबीटीच्या 167 फाईलचा निपटारा करावा. यातुन महसुल वाढ होणार आहे. सन 2017 चे परीपत्रक आहे त्यात 6 महीण्याची मुदत शासनाने दिलेली आहे. अनाधिकृत बांधकाम शास्तीची वसुली करण्यासाठी 3 महीण्याचा कालावधी सम्पलेला आहे. या तीन महीण्यात 35 कोटी रुपये कसे वसुल होणार हे सांगावे. नगररचना विभागाच्या 1600 संचिका आल्या होत्या पैकी 1400 संचिका निकाली

काढल्या आहेत उर्वरीत संचिका सुध्दा निकाली काढाव्यात. यातून महसूल जमा होईल. हार्डशिप प्रीमीयम बंद झालेला आहे व यात 10 कोटी रुपयाचे उत्पन्न दाखविले आहे. हे चुकीचे आहे.कम्पाडींग फी यात समावेश केलेला मग डबल तीच ती बाब दाखविली आहे. कम्पाडींगचे रु.35 कोटी दाखविले असल्याने ती वसुल होणार नसल्याने 45 कोटी रुपये हे दाखविले कसे असे मला वाटते. गुंठेवारीचे 10 कोटी रुपये दाखविले आहे ते बंद आहे. चालू करावयाची की नाही हा सभागृहाचा अधिकार आहे. हे देखील प्रशासनाने चुकीचे दाखविले आहे. गुंठेवारीचा विषय सभागृहासमोर आणावा. केंद्र शासनाचे आकाशवाणी,पोस्ट ऑफीस या कार्यालयास सेवा कर आपण वसुल करावा. इतर कर त्यांना लागु होत नाही. यात ही आपले उत्पन वाढ होण्यास मदत होणार आहे. बीएसएनएलला सुध्दा आपण मालमता कर आकारावा. तसेच महाविरण कंपनीला ही मालमता कर आकारावा. यातुन आपणास महसुल वाढ होईल. वार्ड विकास निधी व नगरसेवक स्वेच्छा निधी हे दोनही शिर्षक वेगवेगळे आहेत. नगरसेवक निधीचे टेन्डर निघणार आहेत यासाठी वेगळे पैश्याचे शिर्षक तयार ठेवावे म्हणजे आमच्या वार्डातील कामे गुत्तेदार घेईल. बांधकाम परवानगीच्या वेळी सुरक्षा रक्कम ठेवण्यात येते ती रक्कम पुर्णपणे नगरसेवक निधी म्हणुन वापरता यावी. नगरसेवक निधी म्हणुन मागील वर्षीचे 10 लक्ष व यावर्षीचे 10 लक्ष रुपये एकुण 20 लक्ष रुपये ठेवण्यात यावे अशी आपणास विनंती आहे. एक शेर घेवून माझे मनोगत पुर्ण करतो.

**बालाजी कल्याणकर** मनपाचे उत्पन वाढ केली पाहीजे. गत वर्षी मालमता कर 165 कोटी रुपये होता या पैकी केवळ 42 रु. वसुल झालेला आहे. रु 63 कोटी शास्ती ही जास्त प्रमाणात आहे. ही शास्ती पुर्णपणे माफ करावी अशी विनंती करतो.

**सभागृह नेता** पुढचे बजेट तयार करतांना मागे सुध्दा आपण पाहीले पाहीजे. गतवर्षी कचरा हा विषय बराच चालला आहे. आता कचरा संकलन करण्यासाठी शहरात गाडया दाखल झालेल्या आहेत. उर्वरीत गाडया येणार आहेत. यातुन कच-याचा प्रश्न सुटणार आहे. स्टेडीयमचे काम पुर्ण करीत आहोत कोणतेही अनुदान न घेता क्रिकेट ट्रब आपण तयार केली आहे. शासनाने आपल्याला रु.42 कोटी रुपयाचा निधी उपलब्ध करुन दिला आहे. सदरचे स्टेडीयम हे श्री गुरुगोविंदसिंघ महाराज यांच्या नांवाने आहे. त्यांच्या नांवाला शोभेल असे आपण काम करीत आहोत. यामुळे आपल्या शहराचे क्रिकेटच्या माध्यमातुन आंतराष्ट्रीय दर्जाचे सामने आयोजीत करण्यात यावे. हे स्टेडीयम एका वर्षाच्या आत पुर्ण करुन घ्यावे. कर-याचा डीपीआर देखील शासनाने मंजूर केला आहे. कच-याचे प्रोसेंगील प्लान्ट आपण तयार करुन खत निर्मीत प्रकल्प सुरु केला पाहीजे. इतर उत्पनाचे साधन आपल्याकडे नाही त्यामुळे मालमता कर व नगररचना विभागातून जमा होणारी रक्कम हे उत्पन आपणास मिळणार आहे. अनाधिकृत बांधकाम शास्ती लावु नये असे तत्कालीन आयुक्तांना आम्ही विनंती केली होती परंतू त्यांनी ती लावल्यामुळे आता कर गोळा होत नाही. बांधकाम शास्ती मध्ये काही प्रमाणात रिलीप देण्यात यावे. 2000 फुटाचे पेक्षा प्लाट आहे त्यांना आपण डबल पाणी कर आकारत असतो. ही मागणी पाच वर्षाची यावर्षी दिलेली आहे.हाही टॅक्स एकदाच वाढ झालेली आहे. इ-गर्व्हन्समुळे नागरीकांना डबल पाणी कर लागला आहे त्यांनी पाणी कर दर वर्षी भरला आहे त्यांच्याकडे पावत्या आहेत. तरीही त्यांना कर नव्याने भरावा लागत आहे. इ-गर्व्हन्स मध्ये सुधारणा करावी. अबचलनगरला सुध्दा आजपर्यत घर नंबर पडलेला नाही. तसेच 1965 ला लेआऊट करुन प्लॉट टाकले आहेत यासही घर नंबर देण्यात यावा. यावर्षी आपण नगररचना विभागाचे उत्पन वाढीसाठी प्रयत्न करीत आहात त्याबददल आपले आभार व्यक्त करतो. आरआरनुसार आपण बांधकाम परवानगीचे पैसे जमा करुन घेतो याचे दर वेळो वेळी प्रशासनाने पहावे. लोकांना जास्त रक्कम भरण्यासाठी पत्र व्यवहार करु नये याची काळजी प्रशासनाने घ्यावी. नागरीकांना त्रास होणार याकडे लक्ष दयावे. पाणी पुरवठयाची वाढ आपण दरवर्षी करीत आहोत. रु.1500/- वरुन हा कर 2600/- रुपयावर आलेला आहे. यावर्षी 10 वाढ आहे यावर्षी थांबवावी. मुळ जोडणी ही रु.500/- मध्ये ठेवावी. नळ जोडणीत वाढ झाल्यास आपले उत्पनात ही वाढ होईल. शासनाकडे रु.200 कोटीचे जे प्रस्ताव पाठवले आहेत त्यापैकी 42.00 कोटी रुपये आपणास व विदयापीठास रु. 25.00 कोटी शासनाने दिले आहेत इतरही प्रकल्पाचा निधी मिळू घेण्यासाठी पाठपुरावा करावा. छत्रपती शाहु महाराज यांचा पुतळा तयार झालेला आहे येत्या त्यांच्या जुन महीण्यात जयंती आहे त्या जयंतीच्या दिवशी पुतळा बसवावा. महात्मा ज्योतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांचा पुतळयास सुध्दा मान्यता घेवून तोही बसविण्यात यावा. महात्मा बसवेश्वर पुतळा बसविण्यासाठी सुध्दा प्रयत्न करावे. दलीत वस्तीचे सुध्दा पैसे आपणास मिळाले पाहीजे.शासनाकडून आलेला निधी आपणास जर वेळेवर मिळाला नाहीतर त्याकरीता आम्ही न्यायालय गाठू असे मी सांगतो. शास्ती ही उतरत्या क्रमाणे माफ करावी गतवर्षी प्रमाणे यावर्षी ठेवावी. अनाधिकृत बांधकामवर शास्ती लावली त्या शास्ती

वरील व्याज लावली आहे ती माफ करावी. नगरसवेकाचे कामे एका महीण्याचे आत मंजूर करावे. सभापती महोदयांनी यावर्षी देखभाल दुरुस्तीचे वर्ष घोषीत केले आहे त्यामुळे मुख्य रस्त्याला मिळणारे लहान लहान रस्त्याचे कामे हाती घेण्यात यावी अशी आपणास विनंती आहे. सभागृहात ज्या सुचना प्राप्त होतील त्या सुचना व सभा संपल्यानंतरच्या सदस्यांच्या सर्व सुचनाचा विचार करुन पुर्ण अधिकार मा. महापौर यांना देण्यात यावे. त्यानंतर आपण बजेट अंतिम करु.

**किशोर स्वामी** मनपाचे उत्पन हे बांधकाम परवानगीच्या माध्यमातुन मिळत आहे.कचराचा प्रश्न आता पाच वर्षासाठी बंद झालेला आहे. बांधकाम परवानगीचा ठोस निर्णय घ्यावा. नगररचना विभागाने एवढे प्रकरण प्राप्त झाली तर ऐवढे प्रकरणे आम्ही निकाली काढू असे सांगीतले पाहीजे. गोधर्वन घाट स्मशान भुमी, मरघाट, लिगांयत समाजाची स्मशानभुमी असो त्याची वाईट अशी अवस्था झालेली आहे. स्मशानभुमीसाठी रु. 2 कोटीचा निधी ठेवला आहे तो वाढ करुन 5 कोटी करण्यात यावा. थोर पुरुषाचे पुतळया संदर्भात कार्यवाही सुरु आहे त्याकरीता ठेवलेली निधी अपुरी पडेल याकरीता जास्त निधी ठेवण्यात यावी. महात्मा बसवेश्वर पुतळा बांधण्यास मंजूरी त्याविषयी मा.सभापती साहेबांनी ठेवले आहेत त्यांचे व इतर स्थायी समिती सदस्याचे मी आभार व्यक्त करतो. पुतळया संदर्भात मा. अशोकरावजी चव्हाण साहेबांचा पाठ पुरावा आहे. महात्मा बसवेश्वर यांच्या पुतळयाचा मोठा प्लेक्स लावावा म्हणजे नागरीकांना याची माहीती होईल. सर्वाचे आभार पुन्हा मानतो आणि थांबतो.

**सतिश देशमुख** नदी प्रदुषन होणार नाही याची आपण काळजी घेत आहात. जशी साबरमती येथे नदीमध्ये बोटी आहेत तशा बोटी आपल्याकडे ठेवण्यात याव्यात त्याच धर्तीवर आपले नदी प्रदुषन दुर करावे. शिख समाज दक्षीण काशी म्हणुन नांदेडला येत असतात. त्यामुळे पर्यटन म्हणून आपले उत्पन वाढेल. स्मशान भुमी विकास करण्यासाठी जास्तीत जास्त निधी ठेवण्यात यावा. विमानतळा लगतचा वॉकींग ट्रक तयार करावा. परवाना नगर व बीअन्डसी कॉलनी या ठिकाणच्या टाक्या खाली जीम व वाचनालय सुरु करावे.

**महेंद्र पिंपळे** पान क्रमांक 29 वर डॉ.बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेसाठी रु.3.00 लक्षाची तरतुद ठेवली आहे. यावर्षी बौध्द धर्माचे मोठे धर्मगुरु दलाई लामा यांना बोलवण्याचे निश्चीत झालेले आहे त्यांच्या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी रु 15.00 लक्षाची तरतूद करण्यात यावी अशी आपणास विनंती आहे.

**फारुख अली खाँ** बजेट सादर करीत असतांना खुप चांगले वाटते परंतू प्रत्यक्षात काम होतांना दिसत नाही कारण गेल्या अकरा वर्षापासुन मी हे पाहात आलो आहे. मागील तीन वर्षाच्या बजेटमध्ये त्या स्मशान भुमीच्या आवार भिंतीचा उल्लेख केला आहे परंतू काम होत नाही. मा.आयुक्तांनी जे बजेट सादर केले आहे ते चांगले आहे आम्हाला आशा आहे की आपण नांदेडच्या जनतेला आशेचा किरण दिसत आहात. आपण काही तरी करुन दाखवणार आहात. आसरा नगरच्या स्मशानभुमीला आवार भिंतीचे बांधकाम करावे. मोठया दवाखान्यात एका व्हीआयपी हॉटेलपेक्षाही जास्त पैसा आकारला जातो त्यावर आळा आणावा. एक सर्वे करुन त्या दवाखान्याला मालमता कर डबल करावा.

**गुरप्रीतकौर सोडी** भगवान श्रीराम यांच्या जयंती निमीत्त रक्कम ठेवली नाही ती ठेवण्यात यावी. भगवान श्रीराम यांची शोभायात्रेचा स्वागत मनपाने करावे अशी मी विनंती करते. बजेट बुक चे पान 16 व 29 वर श्री गुरुगोविंदसिंघ महाराज यांच्या जयंतीसाठी रु.1000/- ची तरतुद केली आहे. श्री गुरुगोविंदसिंघ महाराज यांच्या नांवाने शहरात रु.1000 कोटीचा निधी आलेला असतांना त्यांच्या जयंती साठी केवळ 1000/- रुपये ठेवले असल्याने पुर्ण शिख समाजाचे मन दुखविले आहे. सभापती यांनी श्री गुरुगोविंदसिंघ महाराज यांच्या जयंतीचा खर्चासाठी रुपये 1000/- तरतुद ठेवल्याबाबत मी त्यांचा निषेध करते.

**अब्दुल सतार** नांदेड शहराचा विकास करण्यासाठी आमच्या युपीए सरकार मधील असलेले माजी पंतप्रधान मनमोहनसींघ यांनी व मा.सोनिया गांधी यांनी श्री गुरुगोविंदसिंघ महाराज नगरी म्हणुन मोठयाप्रमाणात निधी उपलब्ध करुन दिला आहे. बीओटी वरील कॉम्पलेक्स आहेत, इतरही महत्वाचे विषय आहेत ते आपण पुर्ण करावे आमचे अधिकारी सक्षम आहेत यात शंका नाही. मनपाचे कॉम्पलेक्स हे अर्धवट आहेत ते पुर्ण करुन घ्यावे. वजीराबाद येथील 400 घरे तयार होवून पुर्ण झालेले आहे. मा. मुख्यमंत्री महोदयांची वेळ घेवून लोकार्पण करावे. आमच्या महीला महापौर आहेत त्यांच्या कालावधीमध्ये जास्तीत जास्त निधी मिळाला पाहीजे. शहरातील रस्ते हॉटमिक्स झाले पाहीजे अशी माझी धारणा आहे. जुन्या सिटी मध्ये काम होत नाही नविन सिटी मध्ये कामे होत आहेत शासनाकडून यासाठी निधी आणुन विकास करावा अशी आपणास विनंती आहे. शासन या मनपास निधी देत नाही केवळ 42 कोटी रुपये शासनाने दिले आहेत. शासनाकडे 225 कोटी रुपयाचे प्रपोजल पाठविले होते उर्वरीत रक्कम मिळणेसाठी प्रयत्न करावे. नगरसेवक निधीचा शिर्षक

वेगळा ठेवले आहे. प्रत्येक प्रभागासाठी एक कोटी रुपये ठेवण्यात यावे. आम्ही उत्पनावर सुध्दा आमचे लक्ष आहे. आम्ही खर्चच करीत नाही. वर्षाला 10 टक्के वाढ करु नये. अनाधिकृत नळ आहेत त्याना दंड आकारण्यात यावा. हॉटेलला अनाधिकृत नळ आहेत ते शोधुन काढावे. जो टीन शेड बांधत आहे तो परवानगी न घेता काम करीत आहे परंतू आपण आरसीसीचा काम करीत आहे त्याचा निधी आपणास मिळत आहे. अशा टिन शेडला पैसे आकारावे. बिल्डर्सवर जास्त लक्ष दयावे.हे जास्तीचे बांधकाम करीत आहेत त्यावर नियंत्रण ठेवले पाहीजे. बीजी महाराजाच्या वार्डात रस्त्यावर मोठे कॉम्पलेक्स बांधण्यात येत आहे त्यावर आपले का नियंत्रण राहत नाही याचा खुलासा करावा. आपली बांधकाम करणा-यावर वचक राहीली पाहीजे. दंड जास्त लावावा. सोडी मॅडमने जो निधी प्रस्तावित करतील त्याच्या 4 पट निधी वाढ करुन ठेवावा. दलीतवस्तीचे फंड आलेला आहे शहरात या निधीतुन कामे होत आहेत परंतू मुस्लीम एरीयात विकासाची कामे होत नाहीत त्यासाठी वेगळा निधी देण्यात यावा. आपण नगरसेवकास मान दिला आहे अशीच परंपरा चालू राहील अशी मला आशा आहे. एक शिष्ठमंडळ मा. मुख्यमंत्री महोदयांना भेटणेसाठी गेले पाहीजे आणि नांदेडचा विकास करण्यासाठी निधी आणला पाहीजे अशी विनंती मी दिपकसिंह रावत यांना करतो. बजेटमध्ये पुर्ण फेरबदल करण्याचे अधिकार मा. महापौर यांना देण्यात यावे अशी मी सभागृहास विनंती करतो.

**अरशीया कौसर** महीला बाल कल्याण समीतीच्या शिर्षकात रु 1.00 कोटीचा निधी व स्मशानभुमीचा विकासासाठी रु. 2.00 कोटीचा निधी ठेवला आहे. बेवा लेडीज आहेत ते घरोघर जावून पैसे मागीत असतात त्यांच्याकरीता जास्त निधी ठेवला पाहीजे. शहरात साक्षरतेचे प्रमाण 86 टक्के आहे त्यामुळे ग्रंथालयाची संख्या जास्त असली पाहीजे. किमान 10 मोठे वाचनालये असली पाहीजे. सर्व लायब्ररीमध्ये वायफायची सुविधा उपलब्ध करुन दिली पाहीजे. हैदरबाग दवाखान्याच्या शेजारी जास्त अपघात होत असतात. त्या ठिकाणी एक सर्जन असणे आवश्यक आहे. त्याठीकाणी ओटी पण असणे गरजेचे आहे. मी जे आता सांगीतले आहे त्याची आपण महोदया मॅडम कृपया करुन नोंद घ्याल अशी अपेक्षा करते.

**आयुक्त** मा. महापौर मॅडम, मी सर्व स.सदस्यांचे कौतुक करतो की त्यांनी अत्यंत अभ्यास पुर्ण त्यांचे मत मांडले आहे ते लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे. पेपरला बातमी होती की पटटे मारण्यासाठी खर्च होत आहे. शहरात पटटे मारले पाहीजे त्याशिवाय रोड चांगले दिसणार नाहीत. नगररचनेच्या उत्पनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले गेले, असेसमेट बददल सुचना आल्या, नगरसेवक स्वेच्छा निधी या तीन सुचना आलेल्या आहेत तशा इतरही आहेत त्यापैकी वरील तीन एक नगरचना विभागात जून महीण्या पर्यत अर्ज दाखल करुन घेणार आहोत. एकदा अर्ज आले की, कम्पाडींग चार्जसे वसूल करुन घेवून बांधकाम नियमित करणार आहोत. ज्या वाणिज्य वापराच्या आस्थापना आहेत त्यावर आपण लक्ष केंद्रीत करणार आहोत. यावर्षी रिअसेसमेंट करणार आहोत. ज्या नेटमध्ये नाहीत त्या नेटमध्ये घेणार आहोत. नगरसेवक निधीची जी सुचना व्यवहार्य आहे त्याचा निश्चीतच विचार करण्यात येईल.

**महापौर** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सालसन 2017-18 चे सुधारीत व 2018-19 चे मुळ अदांजपत्रक सादर करीत असतांना नांदेड नगरीस ऐतीहासीक महत्व प्राप्त झाले असुन प.पु. श्री गुरुगोविंदसिंघजी महाराज यांच्या पावन स्मृतीने पावन झालेले नांदेड शहर हे जगभर प्रसिध्दीस आलेले आहे. बोधीसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानाच्या माध्यमातून शहराची पहीली बौध्द महापौर होण्याचा मान मला आपले आदरणीय महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोकरावजी चव्हाण साहेब यांनी या महापौर पदाचा मान मला दिल्याबाबत मी त्यांचे आभार व्यक्त करते. मा. आ. अमिता भाभी, मा. आ. डी. पी. सांवत साहेब व मा. आ. अमरनाथ राजूकर साहेब यांचे आभार मानते तसेच सर्व जेष्ठ नेत्यांचे या प्रसंगी मी सर्वाचे आभार मानते. नांदेडचे प्रथम लोक नियुक्त नगराध्यक्ष डॉ. कै. शंकररावजी चव्हाण साहेब यांना मी नम्र अभिवादन करते. सालसन 2017-18 चे सुधारीत व 2018-19 चे मुळ अदांजपत्रक आपणास समोर सादर करतांना मला मनापासुन आंनद होत आहे. मनपा आयुक्त यांनी स्थायी समितीस सादर केलेले सालसन 2017-18 चे सुधारीत व 2018-19 चे मुळ अदांजपत्रक व स्थायी समितीने सर्व साधारण सभे समोर मान्यतेसाठी सादर केले आहे. नांदेड शहराचे सुजान नागरीकांनी कॉग्रेस पक्षाला बहुमत दिले आहे त्याबददल सर्व शहरातील नागरीकांचेही मी या ठिकाणी आभार व्यक्त करते. कोणत्याही प्रकारची कर वाढ न करता हा अर्थसंकल्प सादर करीत आहे. सर्व योजना या पुर्ण करण्यासाठी कठिबध्द आहे असे मी या प्रसंगी आश्वासन देते. नांदेडचे आ. मा. हेमंत पाटील, नांदेडचे मा. जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या सहकार्य बददल त्यांचेही आभार व्यक्त करते.उपमहापौर श्री विनय गिरडे पाटील, स्थायी समिती सभापती श्री शमीम अब्दुला, सभागृह नेते विरेंद्रसिंघ गाडीवाले,

शिक्षण व महिला बाल कल्याण समिती सभापती संगिता तुपेकर व शिक्षण व महिला बाल कल्याण समिती उप सभापती अल्का शहाने सर्व सदस्य/सदस्या, पत्रकार बंधू व सुजान नागरीक बंधू भगीनी यांनी दिलेल्या सहकार्य बददल आभार व्यक्त करते. महानगरपालिकेचे सर्व योजना राबविणे, सर्व सोयी सुविधा उपलब्ध करुन देणे व इतर शासकिय योजना राबविण्यासाठी अहोरात्र परिश्रम घेणारे महानगरपालिकेचे आयुक्त गणेशजी देशमुख, उप आयुक्त श्री रत्नाकर वाघमारे, श्री संभाजी वाघमारे, श्री संतोष कंदेवार मुख्य लेखाधिकारी व सर्वच अधिकारी व कर्मचारी यांनी अर्थ संकल्प तयार करण्यास परिश्रम घेतले त्याबददल त्यांचे कौतुक करते. भविष्यात ही मी त्यांच्याकडून अशीच कामाची व सहकार्याची अपेक्षा करते जयभिम....

मनपा स्थायी समितीने व आयुक्तांनी शिफारस केलेल्या सालसन 2017-18 चे सुधारीत अंर्थसंकल्प जसेच्या तसे हि मान्यता देण्यात येते.

तसेच मनपा स्थायी समितीने शिफारस केलेल्या सालसन 2018-19 चे मुळ अर्थसंकल्पात पुढील प्रमाणे दर्शविण्यात आल्या प्रमाणे विविध शिर्षकात दुरुस्ती व फेरफार करुन स्थायी समितीनी शिफारस केलेल्या उर्वरीत अर्थसंकल्पास तसेच आयुक्तांच्या प्रस्तावास जसेच्या तसे ही मनपाकेची विशेष सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | महानगरपालिका विशेष सभेने केलेली तरतूद |
|---|---|---|
| 1 | मागील वर्षातील विविध विभागाची थकीत देयकाची अदाई करणेसाठी (स्पील वर्क) | 20,00,00,000 |
| 2 | पाणी पुरवठा व मलनिस्सारण पाईप लाईन टाकण्यासाठी रस्ते खराब झालेले असल्यामुळे सदरील रस्त्यांची दुरुसती करण्याकरिता (Restoration) | 2,50,00,000 |
| 3 | पाणी पुरवठा प्रारंभीक कामे | 2,00,00,000 |
| 4 | नविन भुमिगत गटार | 2,50,00,000 |
| 5 | नविन रस्ते / नविन नाल्या | 10,00,00,000 |
| 6 | पाणी शुध्दीकरणासाठी रसायन खरेदी | 2,00,00,000 |
| 7 | पाणी टंचाई भागात टॅंकरव्दारे तातडीची पाणी पुरवठा करणे / पाणी पुरवठयाची शिल्लक व तातडीचे कामे करणे | 60,00,000 |
| 8 | मागील वर्षातील प्रलंबीत देयके अदाई करणेसाठी (पाणी पुरवठा स्पील वर्क) | 3,50,00,000 |
| 9 | महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचे पत्र ममआ-2018/मर्के/का-07/532 दि. 26.03.2018 अन्वये मनपाकेत स्त्री संसाधन केंद्र (जेंडर रिसोर्सेस सेंटर) (सक्षमा) कक्ष | 25,00,000 |
| 10 | मनपाकेत निर्वाचीत सदस्यांना अंतीम अंदाजपत्रक पुस्तकासहीत सुटकेस पुरवठा करणे | 5,00,000 |
| 11 | नविन ट्राफिक सिंगनल बसविणे | 50,00,000 |
| 12 | श्री गुरुगोविंदसिंघजी स्टेडीयमचे नुतनीकरण व आधुनिकिकरण करणे | 2,00,00,000 |
| 13 | श्री गुरुगोविंदसिंघजी यांच्या जयंती निमित्त क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी | 5,00,000 |
| 14 | घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया प्रकल्पासाठी मनपाकेचा सहभाग | 12,00,00,000 |
| 15 | मनपा वाहनांची देखभाल व दुरुस्ती | 30,00,000 |
| 16 | शंकरराव चव्हाण प्रेक्षगृहाचे देखभाल व दुरुस्ती | 3,00,00,000 |
| 17 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला | 15,00,000 |
| 18 | STP/SPS देखभाल दुरुस्ती | 2,20,00,000 |

**ठराव क्रं.35** **ठराव**

स्थायी समिती, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने दिनांक 28.03.218 ठराव क्रं. 145 अन्वये शिफारस केलेले सालसन 2017-2018 चे सुधारीत अर्थसंकल्प जसेच्या तसे हि नांवामनपा विशेष सभा सर्वानुमते मंजुर करते,

तसेच स्थायी समितीने शिफारस केलेले सन 2018-2019 चे मुळ अर्थसंकल्पात खालील दर्शविण्यात आल्या प्रमाणे विविध शिर्षकात दुरुस्ती व फेरफार सुचवून स्थायी समितीने शिफारस केलेल्या उर्वरीत अर्थसंकल्पास तसेच आयुक्तांच्या प्रस्तावास जसेच्या तसे ही नावाशमनपाकेची विशेष सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुर करते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सालसन 2018-2019 चे मुळ अर्थसंकल्प जमा बाजु**

| अ.क्र. | लेखाशिर्ष | आयुक्तांनी सुचवलेली तरतुद | स्थायी समितीने सुचवलेली तरतुद | महानगरपालिका विशेष सभेने केलेली तरतुद |
|---|---|---|---|---|
| 1 | शासनाचे विशेष अनुदान | 1,50,00,000 | 1,50,00,000 | 36,56,70,000 |

**सालसन 2018-2019 चे मुळ अर्थसंकल्प खर्च बाजू**

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मा. आयुक्तांनी सूचविलेली तरतुद | स्थायी समितीने सूचविलेली तरतुद | महानगरपालिका विशेष सभेने केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|
| 1 | मागील वर्षातील विविध विभागाची थकीत देयकाची अदाई करणेसाठी (स्पील वर्क) | 16,00,00,000 | 16,00,00,000 | 20,00,00,000 |
| 2 | पाणी पुरवठा व मलनिस्सारण पाईप लाईन टाकण्यासाठी रस्ते खराब झालेले असल्यामुळे सदरील रस्त्यांची दुरुसती करण्याकरिता (Restoration) | 50,00,000 | 50,00,000 | 2,50,00,000 |
| 3 | पाणी पुरवठा प्रारंभीक कामे | 1,00,00,000 | 1,00,00,000 | 2,00,00,000 |
| 4 | नविन भुमिगत गटार | 1,00,00,000 | 1,00,00,000 | 2,50,00,000 |
| 5 | नविन रस्ते / नविन नाल्या | 4,00,00,000 | 4,00,00,000 | 10,00,00,000 |
| 6 | पाणी शुध्दीकरणासाठी रसायन खरेदी | 1,50,00,000 | 1,50,00,000 | 2,00,00,000 |
| 7 | पाणी टंचाई भागात टॅकरव्दारे तातडीची पाणी पुरवठा करणे / पाणी पुरवठयाची शिल्लक व तातडीचे कामे करणे | 10,00,000 | 10,00,000 | 60,00,000 |
| 8 | मागील वर्षातील प्रलंबीत देयके अदाई करणेसाठी (पाणी पुरवठा स्पील वर्क) | 3,00,00,000 | 3,00,00,000 | 3,50,00,000 |
| 9 | महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचे पत्र ममआ-2018/मकें/का-07/532 दि. 26.03.2018 अन्वये मनपाकेत स्त्री संसाधन केंद्र (जेंडर रिसोर्सेस सेंटर) (सक्षमा) कक्ष | 00 | 00 | 25,00,000 |
| 10 | मनपाकेत निर्वाचीत सदस्यांना अंतीम अंदाजपत्रक पुस्तकासहीत सुटकेस पुरवठा करणे | 00 | 00 | 5,00,000 |
| 11 | नविन ट्राफिक सिंगनल बसविणे | 15,00,000 | 15,00,000 | 50,00,000 |
| 12 | श्री गुरुगोविंदसिंघजी स्टेडीयमचे नुतनीकरण व आधुनिकिकरण करणे | 00 | 00 | 2,00,00,000 |
| 13 | श्री गुरुगोविंदसिंघजी यांच्या जयंती निमित्त क्रिडा व सांस्कृतिक कार्यक्रमासाठी | 00 | 00 | 5,00,000 |
| 14 | घनकचरा व्यवस्थापन प्रक्रिया प्रकल्पासाठी मनपाकेचा सहभाग | 00 | 00 | 12,00,00,000 |
| 15 | मनपा वाहनांची देखभाल व दुरुस्ती | 3,00,000 | 3,00,000 | 30,00,000 |
| 16 | शंकरराव चव्हाण प्रेक्षगृहाचे देखभाल व दुरुस्ती | 5,00,000 | 5,00,000 | 3,00,00,000 |
| 17 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमाला | 3,00,000 | 3,00,000 | 15,00,000 |
| 18 | STP/SPS देखभाल दुरुस्ती | 1,20,00,000 | 1,20,00,000 | 2,20,00,000 |

**महापौर** आजच्या अंदाजपत्रकिय विशेष सभेचे कामकाज संपल्यामुळे सभा संपल्याचे जाहिर करण्यात येते.

**शेवटी राष्ट्रगीत महणण्यात येईल.**

**शेवटी राष्ट्रगित म्हणण्यात आले.**

**स्वाक्षरीत/-**
**नगरसचिव**
नावाशमनपा नांदेड

**स्वाक्षरीत/-**
**महापौर**
नावाशमनपा नांदेड